मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# संस्था व संघटनांचा बारणेंना पाठिंबा

## विविध संस्था, संघटना व राजकीय पक्षांनी लेखी पत्रांद्वारे जाहीर पाठिंबा

**पिंपरी | प्रतिनिधी**

विविध संस्था, संघटना व राजकीय पक्षांनी लेखी पत्रांद्वारे मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.

अखिल भारतीय लाडशाखीय वाणी समाज - पिंपरी चिंचवड शहर, सोमवंशीय क्षत्रिय कासार समाज सेवा मंडळ, निवृत्त कर्मचारी समन्वय समिती व लोककल्याण संस्था, स्वराज्य सेना, महाराष्ट्र नाभिक महामंडळ, राष्ट्रीय बंजारा परिषद, संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटना, पिंपरी-चिंचवड वडार समाज सेवा संघ, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) आदी संघटनांनी बारणे यांना पाठिंब्याचे पत्र दिले आहे.

या प्रसंगी समाजाचे प्रतिनिधी विजय शिनकर, प्रा. डॉ. दीपक येवले, मनोज ब्राह्मणकर, युवा प्रतिनिधी प्रशांत ब्राह्मणकर, मयूर गहिवड आदी मान्यवर उपस्थित होते.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (गवई गट) पिंपरी- चिंचवड शहराध्यक्ष बबन साके, महिला अध्यक्ष रेश्माताई पारधे, युवक अध्यक्ष सागर माने यांनी बारणे यांना पाठिंबा दिला आहे. आमचा पक्ष महाविकास आघाडीत सहभागी असतानाही आम्हाला निवडणूक प्रक्रियेत सामावून घेतलेले नाही. या अपमानाचा बदला घेण्यासाठी आम्ही महायुतीचे उमेदवार बारणे यांच्या प्रचारात सहभागी होऊन त्यांच्या विजयासाठी प्रयत्न करणार आहोत, असे त्यांनी पत्रकात म्हटले आहे.



### सर्व समाजाने एकत्र येवून जाहीर पाठिंबा

» अखिल भारतीय लाडशाखीय वाणी समाज पिंपरी- चिंचवड शहरच्या वतीने बारणे यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. लाडशाखीय वाणी समाज हा पिंपरी-चिंचवड शहर, मावळ तालुका व पनवेल शहरात मोठ्या प्रमाणावर विस्तारलेला असून पिंपरी-चिंचवड शहरात जवळपास 20 हजार मतदार या समाजाचे कायम स्वरूपी रहिवासी आहेत. समाज हा मुख्यत्वे व्यवसाय करणारा असल्याने शहरातील इतर सर्व समाज घटकांशी कायम संपर्कात आहे. त्यामुळेच निवडणुकीच्या दृष्टीने लाडशाखीय वाणी समाजाचे महत्व अधिक आहे. वाणी समाजाची नवीन पिढी देखील व्यापार, डॉक्टर्स, वकील, चार्टर्ड अकौंटंट, आर्किटेक्ट, आयटी या व्यवसायांमध्ये कार्यरत असून या पिढीच्या विचारसरणीत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याची छाप पडली आहे. त्यामुळेच सर्व समाजाने एकत्र येवून पंतप्रधान मोदी आणि शिवसेनेचे मावळ लोकसभेचे उमेदवार खासदार बारणे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.

# पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांचा ‘मोका पॅटर्न’

## 63 गुन्हेगारी टोळ्या तुरुंगात, शहरातील गुन्हेगारी टोळ्यांचे धाबे दणाणले

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराला लागलेली संघटीत गुन्हेगारीची कीड मुळासकट (CHINCHWAD) नष्ट करण्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी ‘मोका पॅटर्न’ प्रभवीपणे राबवला.

याचा परिपाक म्हणजे विनयकुमार चौबे यांनी शहराची धुरा सांभाळल्या पासून 63 गुन्हेगारी टोळ्या सध्या तुरुंगात आहेत. जे भुरटेगिरी करतात, त्यांच्याही मुसक्या आवळल्या जात आहेत. यामुळे शहरातील गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

पोलीस आयुक्तालयाच्या सुरुवातीपासून सर्वाधिक टोळ्यांवर सन 2023 मध्ये प्रभावी (CHINCHWAD)कारवाई झाली आहे. सन 2022 च्या वर्षीच्या तुलनेत दुपटीहून अधिक टोळ्या आणि त्यातील 357 सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोका) अंतर्गत कारवाई करण्यात आली. तर चालू वर्षात 12 गुन्हेगारी टोळ्यांमधील 58 गुन्हेगारांवर मोका लावण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात काम, नोकरी आणि शिक्षणासाठी आलेल्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे अशा लोकांमध्ये दहशत निर्माण करून परिसरात वर्चस्व निर्माण करायचे, अशी लक्षणे असलेल्या भुरट्या आणि स्वयंघोषित भाईना पिंपरी-चिंचवड पोलिसांनी चांगलाच धडा शिकवला आहे. सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरून गुन्हेगारी करणाऱ्या गुन्हेगारांवर मोकासारख्या कायदेशीर कारवायांच्या माध्यमातून पोलिसांनी वचक निर्माण केला आहे.



पोलीस आयुक्तालयाची सुरुवात 15 ऑगस्ट 2018 रोजी झाली. सुरुवातीला गुन्हेगारी टोळ्यांवर संथगतीने कारवाई झाली. मात्र या टोळ्यांच्या कुरापती वाढत असल्याचे निदर्शनास येताच पोलिसांनी मोका सारख्या प्रतिबंधात्मक कारवायांना सुरुवात केली. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी 14 डिसेंबर 2022 रोजी पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त म्हणून पदभार घेतला. त्यानंतर त्यांनी पोलिसांमध्येच खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा लाऊन गुन्हेगारांवर कारवाया करण्यास सुरुवात केली.

| चालू वर्षात मोका लावलेल्या टोळ्या |
|---|
| सुरज किरवले टोळी (पिंपरी) (4 आरोपी) |
| रोहित खताळ टोळी (वाकड) (12 आरोपी) |
| अमन पुजारी टोळी (निगडी) (3 आरोपी) |
| राहुल यादव टोळी (चिखली) (5 आरोपी) |
| पवन उजगरे टोळी (भोसरी) (3 आरोपी) |
| आदित्य उर्फ निरंजन अहिरराव टोळी (वाकड) (3 आरोपी) |
| निलेश रेनवा टोळी (चिखली) (4 आरोपी) |
| आदर्श उर्फ कुक्या जगताप (भोसरी) (3 आरोपी) |
| राहुल पवार टोळी (महाळुंगे एमआयडीसी) (5 आरोपी) |
| शाहरुख खान टोळी (5 आरोपी) |
| सुरज शिंदे टोळी (7 आरोपी) |
| प्रकाश उर्फ गणेश नामदेव श्रीगोंड टोळी (2 आरोपी) |

# मतदानासाठी 12 ओळखीचे पुरावे ग्राह्य

## कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येणार : डॉ. दिवसे

**पुणे | प्रतिनिधी**

मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ पुरावे ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे.

पुणे जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीअंतर्गत ७ मे रोजी बारामती आणि १३ मे रोजी मावळ, पुणे आणि शिरूर या तीन मतदारसंघात मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी ही माहिती दिली आहे. छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र आहे असे मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्र सादर करतील.



छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. पारपत्र (पासपोर्ट), वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, निवृत्तीवेतनाची दस्तावेज, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, आधार कार्ड, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. प्रवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण करण्यात येत आहे. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि छायाचित्र ओळखपत्र सोबत न्यावे, असे आवाहनही जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### आपल्या मतदान केंद्राविषयी जाणून घ्या..

» मावळ लोकसभा मतदारसंघांतर्गत पिंपरी, चिंचवड, मावळ, कर्जत, पनवेल आणि उरण विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. पुणे लोकसभा मतदारसंघांतर्गत कोथरूड, शिवाजी नगर, वडगाव शेरी, कसबा, पर्वती आणि पुणे कॅन्टॉन्मेंट मतदारसंघ आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघांतर्गत बारामती, दौंड, इंदापूर, पुरंदर, भोर-वेल्हा आणि खडकवासला मतदारसंघाचा समावेश होतो. शिरूर लोकसभा मतदारसंघांतर्गत जुन्नर, आंबेगाव, खेड आळंदी, हवेली, हडपसर आणि भोसरी विधानसभा मतदारसंघाचा भाग आहे.लोकसभा मतदारसंघ क्षेत्राचा विस्तार लक्षात घेता नागरिकांनी मतदानापूर्वी आपल्या मतदान केंद्राची माहिती घ्यावी. जिल्हा प्रशासनाने मतदारांना मतदान करणे सुलभ व्हावे यादृष्टीने मतदान केंद्राची माहिती देण्यासाठी मतदार सहाय्यता केंद्र स्थापित केले आहेत. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर किंवा ॲपद्वारेही ही माहिती मिळू शकेल. मतदारांना वितरीत करण्यात येणाऱ्या मतदार माहिती चिठ्ठीद्वारेदेखील कुठे मतदान करावयाचे आहे ते कळू शकेल.


# उष्णतेच्या झळा, पुढील आठवड्यात पावसाचा इशारा

## कमाल तापमानात दीड ते दोन अंश सेल्सिअसने वाढ झाली

**पुणे | प्रतिनिधी**

पुढील आठवड्यात अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मे महिन्याच्या सुरुवातीच्या काही दिवसात तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. आठवडाभर हे वातावरण कायम राहणार आहे. कमाल तापमानात दीड ते दोन अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. शनिवारी सर्वाधिक ४४.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद अकोला येथे झाली.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात शनिवारी विदर्भ आणि मराठवाड्याला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागला. राज्यात सर्वाधिक ४४.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद अकोला येथे झाली. त्याखालोखाल अमरावती ४३.८, बुलढाणा ४०.०,




चंद्रपूर ४३.८, गडचिरोली, वर्धा आणि वाशिम ४३.० आणि नागपूर येथे ४१.५ अंश सेल्सिअस तापमान होते.

मराठवाड्यात परभणीत ४३.६, औरंगाबादमध्ये ४१.६, बीडमध्ये ४३.१ अंश तापमान होते. मध्य महाराष्ट्रात सोलापूर ४३.४, सांगली ४१.६, सातारा ४०.९, जळगावात ४२.३ आणि मालेगावात ४२.८ अंश सेल्सिअस तापमान होते. किनारपट्टीवर डहाणूत ३५.८, कुलाब्यात ३३.२ आणि रत्नागिरीत ३३.० अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. राज्यातील २३ जिल्ह्यांत पारा चाळीशी पार गेला होता.

आयएमडीने वर्तवलेल्या अंदाजानुसार, मे महिन्यात देशाच्या अनेक भागांमध्ये तीव्र उष्णता पाहायला मिळणार आहे. दीर्घकाळ उष्णतेची लाट येण्याचा इशारा दिला हवामान विभागाने दिला आहे. पूर्व भारतात 5 मेपर्यंत आणि दक्षिण द्वीपकल्पीय भारतात 6 मेपर्यंत उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे आणि त्यानंतर उन्हाची तीव्रता कमी होईल, असा अंदाज आहे. 5 आणि 6 मे रोजी ईशान्य भारतात गडगडाटी वादळ आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

आर्द्रतेचे प्रमाण कायम आहे. मुंबईत दिवसा आर्द्रता पातळी 56 टक्के आणि रात्री 67 टक्के नोंदवण्यात आली आहे. येत्या दोन दिवसांत तापमानात वाढ होणार आहे. हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, चक्रीवादळामुळे उत्तरेकडील हवेचे मुंबईच्या दिशेने स्थलांतराला वेग येईल, त्यामुळे तापमानात वाढ होईल.

### विदर्भ, मराठवाड्यात अवकाळी

» हवामान विभागाने विदर्भ आणि मराठवाड्यात सोमवारपासून पुढील तीन दिवस अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांसह पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

# मोदींचा खोटेपणा उघडा पडलाय : ॲड. सरोदे

## पिंपरी-चिंचवडमधील असंख्य वैद्यकीय व्यावसायिकांचे संजोग वाघेरेंना समर्थन

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकांनी ही निवडणूक हातामध्ये घेतलेली आहे. महाराष्ट्रातील आणि देशातील जनतेला नरेंद्र मोदी यांचा खोटेपणा समजला आहे. भाजपच्या सरकारने नवीन कायदे करून इलेक्ट्रॉल बॉण्डसारखा सर्वात मोठा राजकीय घोटाळा केला आहे. २०१४ मध्ये त्यांच्या खोट्या आश्वासनांना भुलून सुशिक्षित लोकांनी केलेली चूक या लोकसभा निवडणुकीत सुधारावी लागेल. देशासाठी आणि संविधानासाठी महाविकास आघाडीला मतदान करा, असे आवाहन निर्भय बनो अभियानाचे संयोजक तथा विधीज्ञ ॲड. असिम सरोदे यांनी केले.

मावळ लोकसभेचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या समर्थनार्थ चिंचवडमध्ये वैद्यकीय व्यावसायिकांचा मेळावा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.



### संजोग वाघेरे पाटील यांचे आवाहन

» उमेदवार संजोग वाघेरे पाटील म्हणाले, दहा वर्षांत देशाला वेगळ्या मार्गाला घेऊन जाण्याचे काम सुरू आहे. नोक-या कमी झाल्या आहेत. वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कंत्राटीकरण वाढले. योजनांची अंमलबजावणी होत नाही. वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. नवीन सुधारणांसाठी आणि तुमचे प्रश्न मांडण्यासाठी तुमचा प्रतिनिधी म्हणून निवडून द्या, असे आवाहन त्यांनी केले. कोरोना काळात महाराष्ट्राचे कुटुंबप्रमुख म्हणून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जबाबदारी सांभाळली. हे डॉक्टर अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतात. त्यांना साथ देण्यासाठी मशाल चिन्ह लक्षात ठेवा, असेही ते म्हणाले.

या वेळी उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्यासह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, महिला संघटिका सुलभा उबाळे, सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, मारुती भापकर, आम आदमी पक्षाचे पदवीधर प्रदेशाध्यक्ष चेतन बेंद्रे, पिंपरी चिंचवड डॉक्टर सेलचे डॉ. सुनील जगताप, डॉ. मनोज राका, मनिषा गरुड, डॉ. अर्चना वाघेरे, डॉ. दत्तात्रय कोकाटे, डॉ. अभय तांबिले, डॉ. वैशाली कुलथे, डॉ. अनिकेत अमृतकर, डॉ. सुजित पोखरकर, डॉ. प्रफुल पगारे यांच्यासह शहरातील विविध डॉक्टर संस्था व संघटना यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ॲड. असीम सरोदे पुढे म्हणाले, मोदींना पराभव दिसू लागलेला आहे. म्हणून ते आता उद्धव ठाकरे यांचे नाव घेऊन जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. कोणत्याही मार्गाने निवडणूक जिंकण्यासाठी काहीही करुन त्यांनी राजकारण खराब केले. भाजपमधील चांगल्या विचारांच्या लोकांना देखील ते पुन्हा सत्तेवर नको आहेत. अनेक उमेदवार मोदींची सभा नको म्हणतात. अतिशय चुकीचे राजकारण त्यांनी केलं आहे. महाराष्ट्रात फिरल्यानंतर जनता भाजप आणि नरेंद्र मोदी यांना कंटाळलेली आहे, हे लक्षात येते. तर फडणवीसांना त्यांनी केलेल्या राजकीय पातकासाठी जनता माफ करणार नाही. राज्यात भाजपला लोकसभेच्या खूप जागा मिळत आहेत. या निवडणुकीचे महत्त्व ओळखून सर्वांनी मावळमध्ये महाविकास आघाडीला व संजोग वाघेरे यांना मतदान करून विजयी करा. आजच्या घडीला त्यांच्यासारख्या विनम्र, संवेदनशील व्यक्तींची राजकारणात गरज आहे, असेही असीम सरोदे म्हणाले. सर्वसामान्यांच्या प्रश्नांचा व त्यांच्या हिताचा विचार इंडिया आघाडीने मांडला असून २५ लाखांचा कॅशलेस विम ही त्यांची घोषणा महत्वाची ठरेल, असेही ते म्हणाले.

या बैठकीचे संयोजन आकाश वाघेरे यांनी केले. मनीषा गरुड व अनिकेत अमृतकर यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. अर्चना वाघेरे यांनी आभार मानले.

# कोल्हे यांच्याकडून पाणबुडीचे पुरावे देऊन दिशाभूल

## कोल्हे यांनी दिलेल्या पुराव्याचा आणि आरोपाचा काही संबंध नाही : आढळराव पाटील

**पिंपरी | प्रतिनिधी**

मी पाणबुडीचा व्यवसाय करत नाही. पाणबुडीचा आणि माझ्या व्यवसायाचा संबंध नाही. मी पाणबुडी बनवतो का? असा प्रश्न उपस्थित करत अमोल कोल्हे हे पाणबुडीचे पुरावे देऊन दिशाभूल करत आहेत. ते सर्वांचं लक्ष विचलित करत आहेत. असं अमोल कोल्हे यांनी सादर केलेल्या पुराव्यानंतर शिवाजीराव आढळराव पाटील म्हणाले आहेत. ते पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

शिवाजीराव आढळराव पाटील म्हणाले, आरोप आणि कोल्हे यांनी सादर केलेल्या पुराव्यांचा काही संबंध नाही. सॉफ्टवेअरविषयी आरोप केला होता. पाणबुडीचा माझ्या व्यवसायाशी काही संबंध नाही. अमोल कोल्हे यांनी सादर केलेले पुरावे हे पाणबुडीचे आहेत. ते सर्वांचं लक्ष विचलित करत आहेत. माझ्या व्यवसायाशी पाणबुडीचा काही संबंध नाही.



### पाच वर्षे कोल्हे गप्प का बसले

» संसदेत प्रश्न विचारल्यानंतर त्या- त्या खासदाराची चौकशी होते. हे अमोल कोल्हे यांना माहिती आहे की नाही? पुढे ते म्हणाले, आठ खासदारांनी प्रश्न विचारले आहेत. विनायक राऊत यांच्यासह इतर खासदार आहेत. पुराव्यांचा आणि माझ्या व्यवसायाचा काही संबंध नाही. त्यांना काही वाटलं असतं तर त्यांनी तक्रार करायला हवी होती. पाच वर्षे कोल्हे गप्प का बसले आहेत. निवडणूक हरल्याची लक्षणं आहेत. असा आरोप ही पाटील यांनी केला आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघ हा पाच वर्ष मागे गेला आहे. ज्या प्रश्नावर विद्यमान खासदारांनी मतं मिळवली, त्या सर्व समस्यांकडे त्यांनी सोयीस्कर दुर्लक्ष केलं. चाकण वाहतुकीच्या समस्येसंदर्भातही त्यांना काहीही करता आले नाही. पाच वर्षात एक रूपयाचेही काम केंद्रातून आणता आले नाही. आलेला निधीही पुर्ण खर्च करता आला नाही. ते पार्टटाईम राजकारण करत असून, जनसामान्यांच्या वेदनांशी त्यांची बांधिलकी नाही. ते केवळ काम करण्याचा अभिनय करत आहेत. अशी घणाघाती टिका शिवाजीराव आढळराव पाटलांनी कोल्हेंवर केली आहे.

बदलेल्या राजकीय समीकरणात राष्ट्रवादीची उमेदवारी नक्कीच फायद्याची ठरले, या मतदारसंघातील पाच आमदार राष्ट्रवादीचे असून एक भाजपचा आहे. राष्ट्रवादीची ताकद असल्यामुळेच महायुतीत राष्ट्रवादीही ही जागा सुटली आहे. भोसरी आणि हडपसरही माझ्या पाठीमागे उभे राहतील, असा मला विश्वास आहे. महायुतीत सर्व पक्ष एकत्र आल्यामुळे त्याचा फायदा निश्चित होईल. असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

# मोदी विरुद्ध गांधी अशीच होणार पुण्याची लढत

## लढतीत ट्विस्ट दोनही प्रमुख नेत्यांच्या झाल्या पुण्यात सभा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीचा प्रचाराची सांगता होण्यासाठी आठवडा बाकी आहे. महायूतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर, वंचित बहुजन आघाडीचे वसंत मोरे आणि एमआयएमचे अनिस सुंडके हे रिंगणात उतरले आहेत. चारही उमेदवारांचा प्रचार सुरू आहे. मात्र, लोकसभेची खरी लढत ही महायूतीचे मुरलीधर मोहोळ आणि महाविकास आघाडीचे रवींद्र धंगेकर यांच्यातच होणार असल्याचे बोलले जात होते. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्या पाठोपाठ काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या पुण्यात झालेल्या जाहीर सभांनंतर पुणे लोकसभेच्या लढतीत ट्विस्ट आला आहे. पुणे लोकसची लढत ही आता मोहोळ विरुद्ध धंगेकर अशी न होता ती आता पंतप्रधान नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची 29 एप्रिलला पुण्यातील रेसकोर्स मैदानावर भव्य सभा झाली तर या सभेला काउंटर करण्याच्या दृष्टीने महाविकास आघाडीने काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची सभा घेतली. 3 मे रोजी पुण्यातील एसएसपीएमएसच्या मैदानावर ही सभा झाली.

या दोन प्रमुख नेत्यांच्या सभा झाल्यानंतर उमेदवारांच्या एकमेकांवरील आरोप-प्रत्यारोपांच्या चर्चा आता मागे पडल्या आहेत. नरेंद्र मोदींनी त्यांच्या भाषणात उल्लेख केलेले राष्ट्रीय मुद्दे, पुण्याच्या संदर्भात केलेल्या गेल्या दहा वर्षात झालेली विकासाची कामे आणि भविष्यातील विकासाचे व्हीजन आणि राहुल गांधींनी त्यांच्या भाषणात केलेल्या मुद्यांची चर्चा सध्या होताना दिसते आहे. पुण्यातील दोन उमेदवारांच्या तुलनेपेक्षा ही देशाची निवडणूक आहे. त्यामुळे या दोन नेत्यांमधील तुलना करूनच मतदान करण्याचा सूर उमटताना दिसत आहे. आपसुकच गेल्या काही दिवसांपासून मोहोळ विरुद्ध धंगेकर या लढतीला आता नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी असे स्वरूप आले आहे.

### दिलेला शब्द आम्ही पाळला

» मोहोळ म्हणाले, “मी महापौर असताना 22 सप्टेंबर 2021 रोजी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला आहे. हे धरण टाटा कंपनीचे आहे. कंपनीकडून पाणी मिळविण्यासाठी प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू. तसेच समान पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी करण्याचा दिलेला शब्द आम्ही पाळला आहे.


# कांदा निर्यातबंदी उठवूनही शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच

## कांद्यावर 550 डॉलर्स किमान निर्यातमूल्य लागू ,40 टक्के निर्यातकरही भरावा लागणार

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यातबंदी शनिवारी उठवली. मात्र, कांद्यावर ५५० डॉलर्स किमान निर्यातमूल्य लागू केले. शिवाय ४० टक्के निर्यातकरही भरावा लागणार आहे. त्यामुळे कांद्यावरील निर्यातबंदी उठवल्याचा फारसा फायदा शेतकरी, व्यापाऱ्यांना होण्याची शक्यता नाही.

केंद्र सरकारच्या परदेशी व्यापार विभागाचे महासंचालक संतोषकुमार सारंगी यांनी शनिवारी काढलेल्या अधिसूचनेत कांद्यावरील निर्यातबंदी उठविल्याचे जाहीर केले. आता कांदानिर्यातीवर ५५० डॉलर्स किमान निर्यातमूल्य (एमईपी) लागू असेल, तसेच ४० टक्के निर्यातकरही लागू असणार आहे. त्यामुळे निर्यातबंदी उठवली, तरीही एमईपी आणि निर्यातकर यामुळे देशातून फारशी निर्यात होण्याची शक्यता नाही.



स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष अनिल घनवट आणि किसान सभेचे सरचिटणीस अजित नवले म्हणाले, की एमईपी आणि निर्यातकरामुळे राज्यात उत्पादित होणारा कांदा निर्यातीसाठी भारतीय बंदरावर पोहोचेपर्यंत ६० ते ६४ हजार रुपये प्रतिटनावर जाणार आहे. शिवाय तो संबंधित देशात निर्यात होईपर्यंत वाहतूक खर्च धरून ७० ते ७५ हजार रुपये प्रतिटनापर्यंत जाईल. इतक्या उच्च दराने देशातून फारसा कांदा निर्यात होण्याची शक्यता नाही. त्यामुळे केंद्र सरकारने अटी-शर्तींचा हा खेळ बंद करून कांद्याच्या खुल्या निर्यातीला परवानगी द्यावी.

कांदाउत्पादक संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे म्हणाले, की कांदाउत्पादक पट्ट्यातील शेतकऱ्यांकडून लोकसभा निवडणुकीत रोष व्यक्त होईल याची जाणीव झाल्यानेच सरकारने काही अटींसह कांदा निर्यातबंदी हटवली आहे. पण, सरकारने कोणत्याही अटी-शर्तींशिवाय कांद्याची निर्यात खुली करावी. कांदा निर्यातबंदीच्या काळातील मागील आठ-नऊ महिन्यांत कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसान भरून देण्यासाठी सरकारने त्यांना प्रतिक्विंटल दोन हजार रुपये दरातील तफावत द्यावी.

अर्थ मंत्रालयाच्या माध्यमातून गतवर्षी प्रथमच ऑगस्टमध्ये ४० टक्के निर्यात शुल्क लादण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा शुल्क मागे घेत प्रतिटन ८५० डॉलर किमान निर्यातमूल्य लागू केले. त्यानंतर हा निर्णय मागे घेत लेट खरीप हंगामात कांद्याची आवक होत असताना निर्यातबंदीचा निर्णय घेतला. त्यामुळे कांदा उत्पादकांच्या अडचणी वाढल्या होत्या. यामुळे पहिल्यांदाच दीर्घकाळ निर्यातबंदी राहिली.

### दीड लाख टन निर्यात शक्य

» जागतिक बाजारात सध्या कांद्याचे दर ७५० ते ८०० डॉलर प्रतिटन आहेत. भारतीय कांदा जागतिक बाजारात जाताच दरातील स्पर्धा वाढून कांदा निर्यातदार पाकिस्तान, इजिप्त, तुर्की, चीन, इराण आपल्या कांद्याचा दर पाडतील. त्या वेळी भारताचा कांदा जागतिक बाजारातील दराच्या स्पर्धेत टिकणार नाही. पुढील दोन महिन्यांत देशातून सुमारे एक ते दीड लाख टन कांद्याची निर्यात होऊ शकेल, अशी माहिती कांदा निर्यातदार संघटनेचे अध्यक्ष अजित शहा यांनी दिली.